# समाज संजीवनी

१०६३
. ग्रं. सं. ठाणें
काव्य
१९५८

REFBK-0013494
REFBK-0013494

श्रीसंत तुकडोजी महाराज

६५२३
९७१३१०७
९९५८
३१०५१

मध्यप्रदेश सरकारच्या समाज-शिक्षण-विभागाने उपयुक्त ठरविलेला,

सर्वांगीण समाजोन्नतीचा सुमधुर शब्दाविष्कार

अर्थात्

# समाज-संजीवनी

( मराठी गीते )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
१९७०
९३०९८

श्रीसंत तुकडोजी महाराज

REFBK-0013494
REFBK-0013494
ग्रंथ संग्रहालय, ठाणे
५४२३८ वि: काव्य
९९५८ ९७१३१०७

पंचमावृत्ति १९६३ मूल्य ६० न. पै.

प्रकाशक :
श्रीगुरुदेव-प्रकाशन;
गुरुकुंज-आश्रम. (अमरावती)

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ति १९४९, प्रती ५०००
द्वितीयावृत्ति १९५०, प्रती ५०००
तृतीयावृत्ति १९५६, प्रती ३०००
चतुर्थावृत्ति १९५९, प्रती ४०००

मुद्रक :
किसनलाल मुंदडा,
गुरुदेव मुद्रणालय, महाल नागपूर २.

... संग्रहालय, ठाणे. स्थलप्र.
अनुक्रम.............................. दिः ..........................
क्रमांक ............................ नोंद दिः ........................

संदेश

# समाजाच्या सर्वोदयाचा मूलमंत्र

मित्रांनो ! समाज-शिक्षण हे मानवसमाजाला उन्नतीच्या उंच शिखरावर नेणारे प्रथम साधन आहे. अशिक्षित खेडुतांमध्ये मनुष्यत्व निर्माण करून त्यांचा राष्ट्राशीं घनिष्ट संबंध जोडणारा व भावी भारत-वर्षाची उज्ज्वल निर्मिती करणारा; हाच आजच्या काळचा खरा धर्म आहे. मागासलेल्या जनतेला दृष्टि देऊन स्वाभिमानाने व स्वावलंबनाने जगण्याचा मंत्र जर आपण आता पढविणार नाही तर परिणाम अत्यंत भयानक होईल; भारतवासीयांना यापुढे सुखाने जगताहि येणार नाही

मी मनापासून इच्छितो की, भारताच्या कोनाकोपऱ्यात आज ही लाट पसरून प्रत्येक अनपढ नागरिक व किसान-मजूर समाज-शिक्षणाच्या जाणीवेने पूर्णपणे भारला गेला पाहिजे. यासाठी राष्ट्रातील सर्व संस्थांनी एकमताने एका महान् यज्ञाप्रमाणे कार्य उचलून धरले पाहिजे. आमच्या सरकारने यासंबंधी जी योजना प्रचलित केली आहे; तिचे मी धन्यवादपूर्वक सहर्ष स्वागत करतो.

या स्वतंत्र भारतात समाजशिक्षणाची योजना म्हणजे आपल्या देशाला स्वर्ग बनविण्याची साधना आहे असे मी समजतो. या लोक-शाहीच्या काळात आपल्या देशाचे भवितव्य घडविण्याची जबाबदारी

देशाच्या प्रत्येक घटकावर सारखीच आहे. त्यासाठी भारतातील प्रत्येक व्यक्ति समजदार, बहुश्रुत व जागरूक असणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्याचा सोपा व सरळ मार्ग समाज-शिक्षण हाच आहे.

साक्षरताप्रसार हा समाजशिक्षणाचा पाया आहे. आपल्या देशातील शेकडा ९० लोक निरक्षर आहेत; अर्थात् त्यांना योग्य रीतीने जीवन जगता येणे कसे शक्य आहे ? यामुळेच हा देश कलाकौशल्याच्या व शोधसुधारणांच्या बाबतीत मागे पडलेला आहे. निर्वाहाचा मुख्य धंदा शेतीचा असून त्यात देखील दरवर्षी तूटच येत आहे. त्यातल्या त्यात जातीयतेने, बुवालोकांनी व पोथ्यापुराणांनी तर या देशाला 'जोगडा' करून सोडले आहे. दुसऱ्या कलावंत व्यापाऱ्यांनी आमच्या जीवावर मजा मारावी व आम्ही मात्र टाळ कुटतच बसावे, असा जणूं संकेतच ठरलेला आहे. देशाचा हा सारा कलंक धुवून निघावा व भारताचा हा प्रत्येक घटक सुसंस्कृत, स्वावलंबी आणि सुखी व्हावा यासाठी समाज-शिक्षणासारखा दुसरा उपाय नाही !

अहो ! डोळे असून जर वस्तूंचे ज्ञान नसेल तर तो आंधळाच ना ? तसेच, सर्वांग सुंदर असूनहि जर त्याला अक्षरज्ञान नसेल तर आजच्या जगात तरी त्याला काय महत्त्व आहे ? तो प्रत्येक ठिकाणी परावलंबी, पांगळा नि पराधीनच राहिल हे उघड आहे ! आज आमच्या देशातील एक माणूस देखील 'अंगठा छाप' असणे हे आम्हा सर्वांना लाजिरवाणे आहे. राष्ट्राचा हा कमजोर घटक म्हणजे राष्ट्राच्या जीवितालाच धोका आहे, हे विसरू नये.

देशात जेवढे पुरुषांना तेवढेच महिलांनाहि साक्षर होणे जरूरीचे आहे. पुरुष आणि स्त्री हे देशाच्या रथाचे दोन चक्र आहेत. देशाचे हे दोन्ही घटक जर उन्नत झाले तर आपल्या भाग्याला काहीच उणीव राहणार नाही. नामदेव व चोखोबांसारख्या संतांच्या स्त्रियांनीहि त्यांच्या

सुरात सूर मिळवून अभंग म्हटले आणि लिहिले आहेत; इतकेच नव्हे तर दळणधाणी करणाऱ्या दासी जनीचे देखील अभंग प्रसिद्ध आहेत. सुसंस्कृत जिजाबाईच्याच पोटी छत्रपति शिवाजीसारखी रत्ने निपजणे स्वाभाविक आहे.

विद्येसारखी पवित्र संजीवनी नाही, असें भगवान् श्रीकृष्णाने सांगून ठेवले आहे. आपल्या हीनदीन बनलेल्या व मृतवत् झालेल्या राष्ट्राला फिरून नवजीवन मिळून त्यात नंदनवन फुलावे असे वाटत असेल तर, त्यासाठी राष्ट्रातील प्रत्येक घटकाला ज्ञानवानच केले पाहिजे. देशांत पोथ्या वाचणारांची आजहि काही उणीव नाही; परंतु पोथी ऐकणारे उभ्या जन्मात कधी वाचक होतील व वाचणारे कधी त्यातील तत्त्वे घेऊन आपले जीवन उजळतील याची कल्पनाहि करवत नाही. ही स्थिति आता आम्ही नष्ट न केली तर परिस्थिति आम्हालाच नष्ट केल्याशिवाय राहणार नाही.

समाज-शिक्षण हाच खरा धर्मयज्ञ आहे, कारण यामुळेच समाजाचे धारणपोषण योग्य रीतीने होऊ शकेल. या दृष्टीनेच राष्ट्रपिता महात्मा गांधींनी या ग्रामोद्धारक योजनेस उत्तेजन दिले होते. त्यांना स्मरूनच आपल्या सरकारनेहि या अत्यंत महत्त्वाच्या कार्यास चालना दिली आहे, हे भारताच्या भाग्योदयाचेच शुभ-चिन्ह आहे !

असे जरी असले तरी, या योजनेत जिव्हाळ्याने काम करणारे लोक मिळणे अगदी अगत्याचे आहे. "शहाणे करूनि सोडावे सकळ जन" या अंतरीच्या कळकळीने खेड्यांत मिसळणारे व मागासलेल्या लोकांना सर्व तऱ्हेने उन्नत करणारे निरपेक्ष सेवाभावी लोक जेवढे मिळत जातील तेवढ्या प्रमाणात ही योजना देशमान्य व यशस्वी होईल हे निर्विवाद आहे. सेवामंडळाच्या सेवक-सेवाधिकाऱ्यांनी व अन्य कार्योत्सुक सज्जनांनी यात स्वतः भाग घेऊन आपल्या विविध रचनात्मक कार्यक्रमाद्वारे जनतेत जागृति निर्माण करावी, यासंबंधी मी वारंवार सूचना देत आलोच आहे.

भारतातील प्रौढांचे-विशेषतः अशिक्षित प्रौढ स्त्रीपुरुषांचे मानसशास्त्र लक्षात घेता, त्यांना ( प्राथमिक शाळेतील वाक्यपद्धति व शब्दपद्धतीपेक्षा ) धार्मिक गीतांच्या द्वारे साक्षर बनविणे व समाजशिक्षण देणे हे अधिक आकर्षक व परिणामकारक ठरले आहे. ही गोष्ट विशेषत्वाने ध्यानात घेण्यासारखी आहे. प्रस्तुत निवडक स्वरूपाची भजनावली ही या दृष्टीनेच समाजशिक्षणकार्यास विशेष उपयोगी ठरेल असे वाटते.

सर्व शेतकरी व मजूरांनी ताबडतोब साक्षर होऊन आपल्या जिविताचे व त्याबरोबरच आपल्या समाजाचे-राष्ट्राचें कल्याण करावे अशी माझी त्यांना विनंती आहे. साक्षरताप्रसाराच्या अनेक वर्गांना व समाज-शिक्षण-केंद्रांना मी आजवर अनेक भेटी दिल्या आहेत आणि मला असा विश्वास उत्पन्न झाला आहे की, जनता समाज-शिक्षणासाठी उमेदीने तयार होऊन "भारताचा राज्यकारभार भारतीय किसान-मजूरानेच चालविला पाहिजे "–ही राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची इच्छा पूर्ण करून दाखवील आणि तेव्हाच समाज-शिक्षणाचे कार्य सफल झाले असे म्हणता येईल !



## विषयानुक्रम


| क्रमांक : | | पृष्ठांक : |
|---|---|---|
| १ | 'मो'हना ! 'क'मललोचना ! | १ |
| २ | लोकशाहीचा मंगल दिवस | २ |
| ३ | आळशा ! ऊठ... | ३ |
| ४ | सर्वोदयाच्या वाटेवर— | ४ |
| ५ | अक्षरशत्रु राहू नको ! | ६ |
| ६ | समाजशिक्षण घेऊ चला ! | ६ |
| ७ | साक्षर होउनि देश भ्रमू ! | ७ |
| ८ | करू खेड्यांची सुधारणा... | ८ |
| ९ | रामधूनचे शुभदर्शन | ९ |
| १० | सुराज्याचा सूर्योदय | ९ |
| ११ | ग्रामोद्योग-साधना | ११ |
| १२ | शांतिसुखाचे ग्रामीण जीवन | १३ |
| १३ | मठमंदिरे तीच विद्यालये ! | १५ |
| १४ | तरुणांनो ! राष्ट्र जागवा ! ! | १६ |
| १५ | अंधश्रद्धा सोडा ! | १६ |
| १६ | विश्वधर्मी प्रार्थना | १७ |
| १७ | सर्व होऊ भारताचे ! | १८ |
| १८ | आदर्श खेडेगांव | १९ |
| १९ | सामुदायिक प्रार्थना अशी करा— | २० |
| २० | मंदिर-प्रवेश | २३ |
| २१ | रूढि आणि धर्म | २४ |
| २२ | परधर्माचा द्वेष नको ! | २५ |
| २३ | ग्रामीण खादी | २६ |

| क्रमांक : | | पृष्ठांक : |
|---|---|---|
| २४ | सुराज्य येण्यासाठी उभ | २७ |
| २५ | समाजाची दुर्दशा ! | २८ |
| २६ | विषमता कोणी निर्माण केली ? | २९ |
| २७ | सेवा हीच खरी भक्ति ! | ३० |
| २८ | साठेबाजी म्हणजे राष्ट्राची चोरी | ३१ |
| २९ | न्याय-तराजू | ३२ |
| ३० | वाहवारे दारूची नशा ! | ३२ |
| ३१ | आपसातील भांडण नि इलेक्शन | ३४ |
| ३२ | गोपाल व्हा ! | ३६ |
| ३३ | शेतकऱ्यांनो ! जीवनशेत सुधारा— | ३७ |
| ३४ | बळी देणे महत्पाप आहे ! | ४० |
| ३५ | बुवाबाजीपासून सावधान ! | ४१ |
| ३६ | स्मृतिसाधनांचा विपर्यास | ४२ |
| ३७ | प्रपंच हा आहे पाया परमार्थाचा | ४३ |
| ३८ | दानाचे रहस्य व प्रयत्नांचे महत्त्व | ४५ |
| ३९ | देशासाठी होई शिपाई— | ४६ |
| ४० | संघटन व स्वातंत्र्यरक्षण | ४७ |
| ४१ | पूज्य गांधीजींची स्फूर्ति | ४९ |
| ४२ | स्वर्गसुखाचे स्वप्न | ५० |
| ४३ | गुरुदेवाचे अवतरण | ५१ |
| ४४ | करूं सोने जरि असेल माती | ५२ |
| ४५ | भारताचे यशोचिंतन | ५३ |


———



राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

# समाज-संजीवनी

— १ —

१३४९८

( चाल : शिवराणा जाइ तो रणा. )

मोहना ! कमललोचना ! यदुनंदना ! पहा तरि नयनां ।
या भारतदेशाची हि कशी रे दैना ॥ धृ० ॥
ऐश्वर्यवान बहु होते, पूर्विच्या काळचे जन ते ।
धनधान्य पेंविही जेथे, नच अन्न खावया तेथे ।
गर्जती वीर चहुंकडे, 'कुणाचे अडे' पडेना कानां ।
कां वेळ अशी पातली आज मनमोहना ! ॥१॥
स्वहितास नोळखी कोणी, नच कर्मधर्म कुणि मानी ।
ना घेति नीतिला कानीं, पळतात सदा अडरानीं ।
हा असा तमाशा कसा? वाढली नशा यत्न समजेना ।
कल्पनाच नुरली काहि आजच्या तरुणां ॥२॥
घरदार आळसापायीं, गमविलें मालकी नाही ।
व्यसनांत गुंग मति राही, ऐकिना कुणि कवणाही ।
नच मानपान राहिला, उगा गलबला भ्रमवितो प्राणा ।
अति धिंगाणा हा मना न बघवे नयना ॥३॥
सांवरी आपुल्या देशा, हे करुणाघन करुणेशा ! ।
एवढी पुरविना आशा, दे बुद्धि जना जगदीशा ! ।
हे सर्व मिळोनी असो, द्वेषमुळिं नसो कुणाचा कोणा ।
तुकड्याची ऐकुनि हाक भीक दे कान्हा ! ॥४॥

# २. लोकशाहिचा मंगल दिवस

( चाल : संदेशा पूज्य गांधीका. )

निघूं दे दिवस मंगल तो, बघाया भारता ! तुजला ।
अवकळा लोपुनी सारी, मिळो सुखशांति सकळांला ।।धृ०।।

राष्ट्र बलवान हो रक्षो,
सदा अपुल्या स्वराज्यासी ।
पूर्णता लोकशाहीची, भुकेला जीव बघण्याला ।। १ ।।

मिटो अस्पृश्यता सगळी,
कळो मानव्यता समता ।
भेद श्रीमंति-गरिबीचा, न भासो भावि कोणाला ।। २ ।।

कळो चारित्र्यता सगळ्या,
नीति जी रामराज्याची ।
नष्ट हो दुर्व्यसन आता, मिळो उद्योग जनतेला ।। ३ ।।

भिकारी ना दिसो कोणी,
आळसी ना असो कोणी ।
मिळो बहुमान मातांना, जसा देशांत पुरुषांला ।। ४ ।।

दुःखवो ना कुणी केव्हा,
भावना अन्य धर्मांच्या ।
प्रीय अपुल्यास तो जैसा, प्रीय हो अन्य सकळांला ।। ५ ।।

दुष्ट, खल, गुंड, छल-द्वेषी,
म्हणे तुकड्या नसो आता ।
न्याय-सत्ता बघो त्यांना, मनोभ्रम दूर करण्याला ।। ६ ।।

# ३. आळसा ! ऊठ....

( चाल : राजहंस माझा. )

स्वातंत्र्य भारतीं आलें, आळशा ! ऊठ जागोनी ॥ धृ. ॥
उजळलें भाग्य देशाचें, कां राहशि तूं झोपोनी ? ।
आनंद मनीं ना मावे, गर्जती चहूं बाजूंनी ।
गांधींच्या जयजयकारें, ही दुमदुमली रे अवनी ।
(अं.) स्वातंत्र्य मिळुनि देशाला । जाहले वर्ष किति त्याला ।
हा विजय शांतिचा झाला ।
लाग लाग तूंही कामीं, आळशा ! ऊठ जागोनी ॥ १ ॥
या प्रिय स्वातंत्र्यासाठी, जाहले किती बलिदान ।
लागले भिकेला काही, धन मान सर्व सोडून ।
कष्टला देशची सारा, नच वस्त्र मिळेना अन्न ।
(अं.) गेले ते दिन दुःखाचे । असतिल ते जातिल साचे ।
अति प्रेम कार्यि नेत्यांचे ।
हो सज्जचि तूं सजवोनी । आळशा ! ऊठ जागोनी ॥ २ ॥
या समाज-शिक्षेसाठी लागले कामि सरकार ।
किति गावीं केंद्रें खुललीं, करितात प्रौढ सत्कार ।
जनतेंत सभ्यता यावी, हा विचार त्यांचा थोर ।
(अं.) उद्योगि खेडि करण्याला । बलवान तरुण बनण्याला ।
सौंदर्य-कला शिकण्याला ।
उघडले नेत्र सर्वांनी । आळशा ! ऊठ जागोनी ॥ ३ ॥
'एक जात मानवतेची' ही देशाची अभिलाषा ।
'नच भिन्न पंथ देवादी, नच भिन्न वेष अणि भाषा ।
सर्वांची हो समदृष्टी, नच राव-रंक हा हा आशा ।

(अं.) 'देशाचा सर्व पसारा । पुरुष हा कार्य करणारा ।
कर्तव्य-फळें घेणारा' ।
तुकड्याचि हाक घे कर्णीं । आळशा ! ऊठ जागोनी ।। ४ ।।

## ४. सर्वोदयाच्या वाटेवर—

( चाल : भक्तासाठी तो जगजेठी बसूनि. )

समाज-शिक्षण घ्यावयास तव बुद्धि येउं दे पुढे ।
काढ हे अज्ञानाचे हुडे ।। धृ० ।।
भोळ्याभाळ्या शेतकऱ्या ! तुज बहुमतेंचि नाडलें ।
तुझ्या कष्टांवर जग वाढलें ।।
काहि कळेना, लिहितां ये ना, बसता ये ना भलें ।
न शिकवुनि तुला पुरें नाडलें ।।
भलभलतीं सांगुनी पुराणें अज्ञानी ठेविलें ।
'आंगठाछाप' चि संबोधिलें ।।
कळुं देरे आता तरी 'देश आपुला' ।
हो साक्षर उत्तम, राहणिने चांगला ।
तें समज हीत-अनहीत बुद्धिने भला ।
घे शिक्षण, घे शिक्षण, अपुला समाज जेणें चढे ।
काढ हे अज्ञानाचे हुडे ।। १ ।।
उत्तम असणें, गोड बोलणें, चपल कार्यि शोभणें ।
तुला येऊं दे सुंदरपणें ।।
शेत साजरें खतामुताने, गायिबैल पाळणें ।
गोजिरे हत्तीसम देखणे ।
दिसतें छोटें मकान अपुलें, टापटीपही मनें ।
दाखवी नटलें सुंदरपणें ।

या सर्व कलांसी शिक्षणची पाहिजे ।
यामुळेचि लोकी पुढाकार घेइजे ।
जो सजे धजे चौघांत राहतो मजें ।
भूषण हें देशाचें असलें वळुं दे खेडयाकडे ।
काढ हें अज्ञानाचें मढें ।। २ ।।

असाच राहशिल वेडयासम तरि कोणि पुसेना तुला ।
शीक रे एखादी तरि कला ।।
उद्योगाशीं रत हो अपुल्या, समज रीतभातही ।
वाढवूं नको समाजीं दुही ।।
जातपात ही सोड सोड, म्हण 'मी मानव जन्मलों'।
'आपुल्या कर्माने वाढलों' ।।
हो दारू-गांजा-अफीम, सारी नशा ।
सेवूंच नको जी घरिं आणी अवदशा ।
हो निर्व्यसनी, या सोडुनि देउनि विषा ।
सर्वांगिण उन्नति व्हाया घे साक्षरतेचे धडे ।
काढ हें अज्ञानाचें मढें ।। ३ ।।

भारतदेशासाठी देह हा देवाने निर्मिला ।
म्हणोनी इथेच तूं जन्मला ।।
रक्षण करणें दीन जनांचें अबलांचेंही तुला ।
म्हणोनी वाढवि अपुल्या बला ।।
देशाचा तूं शूर शिपायी होउनिया वाढला ।
तरिच हा जन्म सफल जाहला ।।
या सर्वोदय-कार्यात लक्ष देउनी ।
हो समाज-शिक्षा अंतरंगि सेवुनी ।
हो उत्तम साक्षर, समजदार, सद्‌गुणी ।

तुकड्यादास म्हणे तुज पाहुनि काळहि मागे दडे ।
काढ हें अज्ञानाचें मढें ।। ४ ।।

## ५. अक्षरशत्रु राहूं नका !

( चाल : असार जिवत केवळ माया. )

स्वतंत्र झाला देश तुझा, तूं वीर शिपायी देशाचा ।
अक्षरशत्रू राहुं नको बघ पाठ घेइ साक्षरतेचा ।।धृ०।।
समाज–शिक्षण घेउनि सगळें, भारत हा उन्नत बनवी ।
शेतकरी तूं, कामकरी तूं, तुझ्या वैभवाला मिळवी ।। १ ।।
तुझें गाव नंदनवन करुनी, वैभव सारें प्राप्त करी ।
"मानवधर्म जगाला तारी" हीच याद राहुं दे पुरी ।। २ ।।
राष्ट्रपिता गांधीजी अपुले, वचना त्यांच्या पूर्ण करी ।
कलापूर्ण संसार तुझा कर, मागुं नको ही माधुकरी ।। ३ ।।
गेले ते बहु दिवस दुखाचे, पुढे नको ती वेळ अता ।
तुकड्यादास म्हणे सावध हो, वाढवि बल अणि बुद्धिमता ।।४ ।।

## ६. समाजशिक्षण घेऊं चला !

( चाल : अवताराचें कार्य कराया. )

शेतकऱ्यांनो ! कामकऱ्यांनो ! समाजशिक्षण घेउं चला ।।धृ०।।
आजवरी दुसऱ्याने केलें राज्य आपुल्या देशाचें ।
स्वतंत्र झाला भारत अपुला, निरोप सकळां देउं चला ।। १ ।।
निरक्षराला साक्षर करुनी देशाचें कल्याण करूं ।
सौंदर्याने नटवूं खेडीं, उत्तम राहणी सेवुं चला ।। २ ।।
बसणें उठणें टापटिपीचें तसेंच सुंदर घर बनवूं ।
समुदायाने करुनि प्रार्थना, निर्मत्सर मनि होउं चला ।। ३ ।।

भेद-भाव हा जातिपातिचा विसरुनि जाऊं या पुढती ।
मानवधर्मा स्थापन करुनी, न्यायनीति वाढवूं चला ॥ ४ ॥
तुकड्यादास म्हणे घ्या कानीं, सुंदर वेळ दिसे पुढची ।
देशासाठी बनूं शिपायी, भूषण सगळे लेवुं चला ॥ ५ ॥

## ७. साक्षर होउनि देश भ्रमूं !

( चाल : अवताराचें कार्य कराया )

या रे या प्रौढांनो ! साक्षर होण्यासाठी सर्व जमूं ।
मातांनो ! या, मिरा जनाई मुक्ताईचा मार्ग क्रमूं ॥ धृ. ॥
निरक्षराला कोणि न पुसती,
ऐसा आला काळ अता ।
समाज-शिक्षा यासाठिच ही, अपुल्या गावोगांवि रमूं ॥ १ ॥
उत्तम राहुनि, मधुर बोलुनी,
शरिराला सुदृढ करुनी ।
देशासाठी सर्वचि जागूं, सानथोर हा मार्ग क्रमूं ॥ २ ॥
पूज्य महात्मा गांधी अपुल्या
देशाचा नेता गेला !!
त्यांची उरली इच्छा पुरती करण्यासी गुरुदेव नमूं ॥ ३ ॥
समुदायाने भजन करूं,
प्रार्थना करूं सद्भावाने ।
भारतमाता उन्नत व्हाया सेवाप्रेमें सदा श्रमूं ॥ ४ ॥
स्वतंत्र झाला देश खरा,
पण शेतकरी दुःखी अजुनी ।
तुकड्यादास म्हणे यासाठिच साक्षर होउनि देश भ्रमूं ॥५॥

# ८. करूं खेड्यांची सुधारणा....

( चाल : या गरिबांनो ! या, झेंडा हातीं. )

या गरिबांनो ! या, काम हातीं घ्या,
करुं खेड्याची सुधारणा काहि हो ! ॥ धृ. ॥
झालं गावाचं रान, सारो सुटली ही घाण,
इथं नाहि जरा झाडझुड काहि हो ।
पाहा मुलं जवान, काय करतात काम ?
यांना जेवायची झोपायची घाइ हो ! ॥ १ ॥
पाहायला साजरा, अंगांत सदरा,
रस्त्यांत भरला पाय हो !
तसाच झटकुन, पळाला पटकुन,
घरांत धांवुनि जाइ हो ! ॥ २ ॥
आला नशिबीं भोग, गावीं शिरला हा रोग,
झाली लोकांना मरायची घाइ हो !
देती कपाळीं हात, घरोघरीं रडतात,
मग वेळेवर सुचायचं नाहि हो ! ॥३॥
झाले विहिरींत जिव, नाहि कोणाला किव,
पाणि तसंच पोहऱ्यांत येइ हो !
आली कॉलऱ्याचि साथ, त्यानं घातलासे हात,
मग सुधारणा व्हायाची नाहि हो ! ॥ ४ ॥
व्हारे व्हारे हुशार, करा काहि कारभार,
गाव उजाड करायचं नाहि हो !
घ्या तुकड्याचि हाक, ठेवा देवाचा धाक,
बघा झोपायचि वेळ नाही काहि हो ! ॥ ५ ॥

# ९. 'रामधून' चें शुभदर्शन

( चाल : गेली घडी पुन्हा येणार. )

सोड आता धामधूम, निघाली रामधून,
चाल गड्या ! बघाया जाउं रे ॥ धृ० ॥
झाडुन-झुडून, सडा-सारवण करून,
रांगोळ्या भरून रंग लावुं रे ॥ १ ॥
घरोघरीं तोरण, मार्गीं चित्रं ठेवून,
कसे करतात जन जरा पाहुं रे ॥ २ ॥
कशी आली शोभा, जरा रहा उभा,
जागोजागीं सभा उत्साहुं रे ॥ ३ ॥
जाती रांगेनं जन, दिसे फौज दुरून,
तेथे रंगतसे मन, सुख घेउं रे ॥ ४ ॥
देतो तुकड्या आदेश, नसे दुसरा लवलेश,
कसा उद्धारूं देश जरा गाउं रे ॥ ५ ॥

# १०. सुराज्याचा सूर्योदय

( चाल : जीवनकी नाव न डोले. )

ऊठ गड्या ! दिवस निघाला ।
रामधून आली घराला ॥
आतावरी झोपि कां गेला ?
काय सांगशील जगाला रे ? ॥ धृ० ॥
झाडझूड झाली सारी, रांगोळिया घरोघरीं ।
आम्र-तोरणें उभारी, आनंदल्या नर-नारी ।

तूंच कसा झोपुनि गेला ?
थोडी समज देइ मनाला,
ऊठ चाल होय रांगेला रे ।। १ ।।

आजवरी आळसानं, घेतलासे जीवप्राण ।
पोटा नाही जरा अन्न, अंगि नाही वस्त्र जुनं ।
बोल अपुल्या काहि मनाला,
देशधर्म नष्ट कां झाला ?
कोणि ना विचारि कुणाला रे ।। २ ।।

स्वातंत्र्य भारतांत, आलं गड्या ! दुमदुमत ।
सोडुं नको आता हात, होइ मस्तचि तूं यांत ।
काय विचारतोसि कुणाला ?
गुंड घालताति रे घाला ।
पहा चोर छातिशीं आला रे ।। ३ ।।

साफ करी घरदार, आपुला-परका व्यवहार ।
भांडण हें सोड सारं, करी एक जातवार ।
तरिच पावे शांति मनाला,
सुख मिळे (सर्व) जनाला,
जीवप्राण लाव पणाला रे ।। ४ ।।

स्वराज्य लाभलं हें, सुराज्य हातीं घे हें ।
सेवा कर सेवका ! हे, हात उभारोनि पाहे ।
तुकड्याची हांक घेण्याला,
(तूंच) खरा मित्र होण्याला,
चाल पुढं, सूर्य निघाला रे ।। ५ ।।

# ११. ग्रामोद्योग-साधना

( चाल : कदम कदम बढाये जा. )

उठा चला मिळोनिया, करूं स्वधर्म-प्रार्थना।
जागवोनिया मना, निरोप देउं बंधुना ॥धृ०॥

धर्मज्ञान आपुलें कितीक नष्ट जाहलें।
भक्तिमार्ग मोडले नि मंदिरांहि तोडलें॥
कोवळेंपणींच ज्ञान धर्मद्रोहि भेटलें।
वृक्ष वाढतांचि बुद्धिमंत लोक भ्रष्टले॥
जीर्ण जाहली रुढी म्हणोनि गेलि वंदना।
आइबाप देवसंत यांसि कोणि मानिना॥ १ ॥

जुनेंच वस्त्र घालुं खादि आपुली विणूनिया।
स्वच्छता पवित्रता कितीतरी सुवस्त्रि या॥
तसेंच अन्न खाउं आपुले घरीं दळोनिया।
तेल शुद्ध घेउ आपुले घरीं पिळोनिया॥
कातुंया स्वतंत्र सूत, काढुं तेल घाणिनी।
आपुल्या घरींच दळूं मोलि बाइ लावुनी॥
तरिच सौख्य पावतें, आरोग्य येइ जीवनां।
कष्टि करूं देह आणि सेवुं रामभूषणा॥ २ ॥

पारतंत्र्य-वृत्ति यंत्र घेउनीच बाणली।
आळशी जनींच आळसेंसि थोर वाढली॥

करा इथेच यंत्र, मोलि नाणतां कुठोनिया ।
कामीं लावुनी गरीब अन्न द्या तयांसि या ॥
कितीक लोक नोकरीविनाच प्राण ठेविना ।
उद्यमास लावुनी जगांत जागवूं जना ॥ ३ ॥

सर्व लेकरें प्रभूस एकपक्षि राहती ।
अम्हीच कां न सर्वप्रेमि ठेवितों तशी मती ?
धर्मद्रोह, जातिद्रोह, देशद्रोह सोडुनी ।
मिळूनि गाउं रामनाम, प्रेमरंगि रंगुनी ॥
सत्यता मनीं धरोनि कृष्णगीत-भूषणां ।
सेवकत्व पावुनी लढूं तसें रणांगणां ॥ ४ ॥

धर्मवर्म आमुचें न खोवुं देउं कोणत्या ।
आश्रमीं मठींतटींचि ज्योति ठेवुं जागत्या ॥
तत्त्वज्ञान शोधुनीच मार्ग जाणुनी वळूं ।
पूर्वजापरोच मार्ग आपुलाहि आकळूं ॥
सर्व संघटूनि एक होउनी 'प्रभू' म्हणा ।
उणा न ठेवुंची कुणा, असेल ज्यास भावना ॥ ५ ॥

या पवित्र होउनी, पवित्र कार्य जाणुनी ।
पवित्रताचि मानवे प्रभूस या जनींवनीं ॥
देहगेह मार्गवर्ग सानथोर हो कुणी ।
पवित्रतेचि एक जात राहुं सर्व होउनी ॥
कर्म आपुलें करोनि या स्मरूं प्रभूगुणां ।
दास तुकड्याचि हाक घ्या जरा तरी मनां ॥ ६ ॥

# १२. शांतिसुखाचें ग्रामीण जीवन

( चाल : ऊठ दे झुगारून बेडी. )

व्हा पवित्र अपुल्या देहीं । याविना मार्ग कुणि नाही । शांतिचा ॥
आचरा तसेंची लोकीं । होउनी मनीं निःशंकी । सर्वही ॥
स्वच्छता घराची ठेवा । शेजार तसाची करवा । आपुला ॥
कैचणें उकिरडे काढा । मळ होइल हृदयीं गाढा । त्यांसवें ॥
जा दिशेस दुर गावाच्या । ना बसा जवळ कोणाच्या । खंडरीं ॥
आपुल्यापरिच लोक हे,
समजणूक हे
रहा धरुनीहि, रहा धरुनीही ।
याविना मार्ग कुणि नाही । शांतिचा ॥ १ ॥

पावित्र्य आचरे अंगीं । तो भक्त म्हणा सत्संगीं । रंगला ॥
तो थोर म्हणा वृत्तीचा । पावित्र्यचि आश्रम ज्याचा । वर्तनीं ॥
स्वच्छ खादि अंगीं घाली । हाताने कष्टुनि केली । जाणुनी ॥
गायीसि मनोभावाने । पाळितो स्वतः अंगाने । लक्षुनी ॥
घरिं सडा पडे धडघडा,
बनुनि निर्भिडा,
झाडि मार्गाहि, झाडि मार्गाही ।
मज गमे मिळत स्वर्गाही । त्यागुणें ॥ २ ॥

पावित्र्य रूप देवाचें । पावित्र्य अंग दासाचें । सर्वथा ॥
तुळशीवृंदावन दारीं । भरि रांगोळी जरदारी । चमकती ॥

घर आजुबाजुने साफ । ना जरा काटि अणि कुंप । सडविले ।।
अरुणोदय होण्यापूर्वी । कामें आटोपी सर्वी । आपुलीं ।।

धन्य तो घरधनी भला,
दिसतसे मला,
मनीं ममताहि, मनीं ममताही ।
ज्या मत्सर तिळही नाही ! अंतरीं ।। ३ ।।

बघतांच पहाटे कोणी । आटपलीं स्नानें त्यांनी । आपुलीं ।।
गीतापाठासी बसला । घालितो नमन सूर्याला । दंडसे ।।
घरिं पुत्रपौत्र सर्वांना । शिकवीत आपुला बाणा । बोधुनी ।।
अहो ! करा, आचरा ऐसें । तरि भक्त बना देवाचे । निश्चयें ।।

नातरी बोलणें परी,
न घरिं आचरीं,
थोर तो नाहि, थोर तो नाही ।
ज्या शुद्ध भावना काही । ना असे ।। ४ ।।

तुकड्याची ऐका वार्ता । हा प्रसंग कानीं पडतां । आचरा ।।
आचरा नि दुसऱ्या सांगा । सकळ गांवि ऐसें वागा । बापहो ।।
तरि वाट मिळे शांतीची । खुंटेल रीत भ्रांतीची । यामुळे ।।

सांगुनी सतत वर्तुनी,
प्रेम देउनी,
बना हो ग्वाहि, बना हो ग्वाही ।
तरि देव सुखाला देई । आमुच्या ।। ५ ।।

# १३. मठमंदिरें तींच विद्यालयें !

(पृथ्वीवृत्त)

कशास मठमंदिरां अणिहि आश्रमा बांधिलें।
अपार धन खर्चुनी, अधिक लोंकि फोफावले ।।
मला गमत सर्व हीं असति पूर्वि विद्यालयें।
जिथे गुरू बसोनिया करिति बोध लोकां स्वयें ।। १ ।।
अता बघत त्या मठा किळस ये जिवीं धावुनी।
गमे कुटिच डाकुची, न बघतो जरा त्या कुणी ।।
तिथे वसति लोक जे अतिच लोभ त्यां वाढला।
म्हणोनि मुळधर्म हा खचित आमुचा लोपला ।। २ ।।
समाज किति पांगला नि बुडला, गळों लागला।
असें न कळतें जया, म्हणुं कसा तया थोरला ?
दिसोनि नयनांस हें न पुढती धरी पाय हे।
अभागि नर तो पुरा, मरुनि कां न जाई भयें ।। ३ ।।
अहो ! भ्रम असा त्यजा, गलित या समाजा बघा।
सुशिक्षित करा मुलां शिकवुनी, पुढे या जगां ।।
जनास कळुं द्या खरा कवण मार्ग हा मुक्तिचा।
उगेच धन वेंचुनी न भरू द्या कुणाचा खिचा ।। ४ ।।
करा सुजनहो ! सुबोध सकलां मनापासुनी।
बळें वर निघो समाज अपुला गुहेआंतुनी ।।
अतिच मळ सांचला, कितितरी रुढचा ह्या कुडचा।
फिरूनि उजळा तयां, त्वरित सत्पथीं घ्या उडचा ।। ५ ।।

(स्फूर्तितरंग)

## १४. तरुणांनो ! राष्ट्र जागवा ! !

(चाल : तुमबिन मेरी कौन.)

राष्ट्र जागवा, राष्ट्र जागवा, जागृत व्हा तरुणांनो ! अमुच्या ॥
वीरवृत्तिचा दिवा उजळवा, जागृत व्हा तरुणांनो ! अमुच्या ॥धृ.॥
धर्मनीति ही दलित दलापरि भारतभूची झाली ।
भक्तिमुक्तिचें सोंग वाढलें, दुर्बलता करि आली । अ० ॥१॥
तत्त्वज्ञान हें विसरुनि गेले, रूढिस मान मिळाला ।
जिकडे तिकडे पंथमतांतर, गोंधळ हा घरिं आला । अ० ॥२॥
सुळसुळाट हा साधुजनांचा पोट भराया झाला ।
यथार्थ कोणि न सांगे कोणा, भ्याडपणा उरिं आला । अ० ॥३॥
सत्यभक्तिचे विसरुनि पथ हे, पोकळ भाव निघाला ।
देवावरती वाहि फुले परि पाणि न दे गरिबाला । अ० ॥४॥
तुकड्यादास म्हणे ही कहाणी सांगा हो ! जनतेला ।
नाहितरी मरणेंच बरें मग भुत परका घरिं आला । अ० ॥५॥

## १५. अंधश्रद्धा सोडा !

(चाल : ठेविलें पाऊल दारी.)

हिंदभूच्या लेकरांनो ! स्वस्थ कां बसता असे ?
भारताचें ग्रहण हें नेत्रीं तुम्हां बघवे कसें ॥धृ०॥
मार्ग काढा उन्नतीचा, या पुढे सरसावुनी ।
भेद-भावा सोडुनी, द्या प्रेम-ऐक्याचे पिसें ॥ १ ॥

जीर्ण ज्या चालीरिती डोळे मिटवुनी ना करा।
वेळ ही पाहोनिया, कर्तव्य शोधा सायसें ॥ २ ॥
आचरा सुविचारवृत्ती अनुभवाला घेउनी।
अंधश्रद्धा सोडुनी, व्यवहार साधा धाडसें ॥ ३ ॥
राहुं द्या सत्प्रेम चित्तीं श्रीहरीसी गावया।
नांदु द्या विजयध्वजा, द्या प्राण समरीं वीरसे ॥ ४ ॥
दास तुकड्या सांगतो, काढा घरांतुनि आळसा।
काव्य बनवा आपुलें, स्वातंत्र्य जें टिकवी तसें ॥ ५ ॥

## १६. विश्वधर्मी प्रार्थना

(चाल : तूं येशिल केव्हातरी.)

मित्रहो ! प्रार्थने चला, जागुंया अपुल्या माणुसकिला ॥धृ.॥

सुखशांति व्हावया जना।
करुं भाव धरुनि प्रार्थना।
हा विश्वधर्म आपुला। जागुंया० ॥ १ ॥

किति पंथ भिन्न जाहले।
येणेंचि राष्ट्र नाशलें।
हा मिटवुं अता गलबला। जागुंया० ॥ २ ॥

अम्हि सर्व एक होउनी।
जातीय वृत्ति सोडुनी।
वाढवूं गुणांची कला। जागुंया० ॥ ३ ॥

तुकड्याचि हाक ऐकण्या।
सुखदुःख प्रभुस सांगण्या।
हा वेळ भला लाभला। जागुंया० ॥ ४ ॥

# १७. सर्व होऊं भारताचे !

(चाल : चला बाई पांडुरंगे पाहूं.)

मंडळाच्या प्रार्थनेला सेवकांनो ! जाउंया ।
भेदभाव सोडविण्या, सर्व गावा लावुंया ।।धृ०।।

कोणि ना अमीर अता, कोणि ना गरीब ।
'सर्व होउं भारताचे' हाचि धरूं भाव ।
'काम करूं, पोट भरूं' हाचि मंत्र सांगुंया ।। १ ।।

कोण हरीजन अता, कोणता ब्राह्मण ?
कोण मराठा नि अता, कोण इतर जन ?
'मानवांचा धर्म एक' गाउंया नि पाहुंया ।। २ ।।

लहान लहान वीर करूं साजिरे शिपायी ।
देशासाठी लढायाची झाली त्यांना घाई ।
धीर देऊं, पाठी राहूं, शक्ति युक्ति यावया ।। ३ ।।

पूज्य गांधी आम्हांसाठी जाहले अर्पण ।
राहिलेलें काम करूं सर्वही आपण ।
दास तुकड्याची आशा पूर्ण करुनि दावुंया ।। ४ ।।

# १८. आदर्श खेडेंगाव

(चाल : चला बाई पांडुरंगे पाहूं.)

मंडळाच्या सेवका ! सेवाभाव सोडि ना ।
विघ्न किती येवो तरी, खेद मनीं मानि ना ।।धृ०।।

भारताचे पुत्र अम्ही नांदु एक होउन ।
जातपात नाही अम्हां 'मानवा' सि सोडुन ।
प्रार्थनेच्या रंगीं रंगूं हीच करूं याचना ।। १ ।।

शेतकरी कामकरी होउनि गोपाल ।
गायी राखूं काम शिकूं, यांतची निहाल ।
गुरुदेव-मंडळासि तोडवितां तोडि ना ।। २ ।।

गावकरी एक होऊं 'रामधुनीं' जावया ।
झाडझूड करूं सारे, मार्ग स्वच्छ दावुंया ।
एक स्वरें गाउं सारे, धन्य म्हणवुं आपणा ।। ३ ।।

व्यायामासि जाउं सारे, साजवुं मैदान ।
सानथोर मिळूनिया व्हावया बलवान ।
देश शक्तिवान करूं, हीच धरी भावना ।। ४ ।।

उद्योगासि घरोघरीं हर्षवुनी लावुंया ।
स्वावलंबी वृत्ति धरूं, आणिकांसि दावुंया ।
दास तुकड्याची हाक, ऐक गड्या ! ऐकना ।। ५ ।।

# १९. सामुदायिक प्रार्थना अशी करा !

( विबुधप्रिया वृत्त )

रे ! मंदिरीं कां पाहसी, ती देवतांची सावली ?
प्रत्यक्ष तो जगतीं रमे, ही याद कां तूं सोडली ?
ती भावना व्हाया तुला, तूं बैस ये सकला जनां ।
या विश्वमंदिर-पूजना, कर सामुदायिक प्रार्थना ।। १ ।।

बघ लोक किति दिसती तुला, जे धर्मवर्म न जाणती ।
किति कष्ट करिती रानटी, विकुनि स्वयें शक्ती मतीं ।।
त्यां मार्गदर्शक व्हावया, ये ज्ञान पाजाया जना ।
या विश्वमंदिर-पूजना, कर सामुदायिक प्रार्थना ।। २ ।।

ना गावमार्गहि चांगले, ना स्वच्छता घरच्या घरीं ।
ना बैसण्याचें ज्ञान अणि, किति घाण ही कपड्यांवरी !
हा बोध द्याया लोकिं या, उमजे न तुज का सज्जना !
या विश्वमंदिर-पूजना, कर सामुदायिक प्रार्थना ।। ३ ।।

किती गाव-खेडीं भारतीं, अज्ञानबुद्धीवाहि जे ।
विस्तार व्हाया बुद्धिचा, सद्ग्रंथ-वाचन पाहिजे ।।
दे संस्कृतीचें ज्ञान अणि दे देशकालिन भावना ।
सद्ग्रंथमंदिर स्थापण्या, कर सामुदायिक प्रार्थना ।। ४ ।।

ना औषधें मिळती कुणा, तैसेंचि कंठिति जीवना ।
या दीन लोकांची दया घे, राव-रंका ! सज्जना ! ॥
करि ऐक्य सेवामंडळीं, या औषधालयकारणा ।
आरोग्यमंदिर स्थापण्या, कर सामुदायिक प्रार्थना ॥ ५ ॥

किति दीन दुर्बल तरुण हे, शिकले जरी शाळेंतही ।
व्यायाम-गोडी ना जयां, करि आवडी निर्माण ही ॥
ज्ञानी जरी असली प्रजा, बलहीन ना हो सज्जना !
व्यायाममंदिर स्थापण्या, कर सामुदायिक प्रार्थना ॥ ६ ॥

निघतील हस्तांकित कला, व्यवसाय साधुनि आपुला ।
कुणिही रिकामा ना दिसो, हो वृद्ध तरुणादी भला ॥
सतिसाध्विही घरच्या घरीं करतील कामें जीवना ।
उद्योगभुवनें स्थापण्या, कर सामुदायिक प्रार्थना ॥ ७ ॥

किति भिन्न मत अणि संप्रदायां त्वां कसें धरिलें करी ।
ही भेदबुद्धी लोभवृत्ती, वाढली अति बावरी ॥
प्रभु एक 'मानवधर्म' इच्छी, त्यागुनी बहु वल्गना ।
उठ आर्यपुत्रा ! झडकरी, कर सामुदायिक प्रार्थना ॥ ८ ॥

ग्रंथ संग्रहालय
93898

पशुपक्षिही किटकें किती बघ मेळ करुनी राहती ।
आपत्ति येतां कोणती, अति संघटुनिया धावती ॥
तूं मानवाचा देह धरुनी, कां न तुज ही भावना ?
निजभावशक्तीवर्धना, कर सामुदायिक प्रार्थना ॥ ९ ॥

हा भेद स्पर्शास्पर्श सोडुनि प्रार्थनीं एकी करा ।
सद्धर्म हा वर्मासहित कळुंद्या जना, सांगा पुरा ।
ही वेळ पूर्वीची नसे, तूं वर्तमाना पाहिना ।
मानव्यधर्मा जागण्या, कर सामुदायिक प्रार्थना ॥१०॥

'मी एकटा नच, विश्व हें मम' भावना ही व्हावया ।
अध्यात्म कसला सांगण्या अणि अनुभवाही यावया ॥
सुखःदुख सम समजावया, अति उच्च व्हाया भावना ।
घे विश्वबंधू-योग हा, कर सामुदायिक प्रार्थना ॥११॥

जरि वेदविद्वत्ता असे अणि भाषणादिकही असे ।
पण तेज ना अणि त्याग ना, तों सर्वची ओसें दिसे ॥
तुकड्या म्हणे यालागि तूं करि ध्यान-मानस पूजना ।
निजकार्यशक्ती साधण्या, कर सामुदायिक प्रार्थना ॥१२॥

हे ईश्वरा ! अम्हि सर्वही सहकारि हो, उपकारि हो ।
हो भक्तिशाली धीर हो, अम्हि शूर हो गंभीर हो ! !
परमार्थमय संसार हो, व्यवहार नीती-साधना ।
जगदीश्वरा ! या भारतीं हो सामुदायिक प्रार्थना ॥१३॥

(आदेशरचना)



# २०. मंदिरप्रवेश

(चाल : हरहर बोलाना)

या रे या सगळे, करूं दर्शन देवाचें।
दिवस सुखाचे, स्वातंत्र्याचे ॥ धृ. ॥

या रे हरिजन ! या, मंदिर उघडें करुंया।
जातीपंथ अता विसरुनिया जाऊंया।
नंदादिप उजळूं या मानवधर्माचे।
दिवस सुखाचे, स्वातंत्र्याचे ॥ १ ॥

दिसती विहिरी या, पाणि भरूं हर्षाने।
दिधला हुकुम असा अपुल्या सरकाराने।
स्पृश्यास्पृश्य अता सरलें जातियतेचें॥
दिवस सुखाचें, स्वातंत्र्याचे ॥ २ ॥

आली संक्रांती नवक्रांती दर्शाया।
तिळगुळ वाटु चला, हरीजनांच्या घरि या।
तोडूं बंधन हें होतें बहु दिवसांचें॥
दिवस सुखाचे, स्वातंत्र्याचे ॥ ३ ॥

आलें सतयुग रे ! जिकडे तिकडे सांगा।
आता न्यायाने, बलधर्माने वागा।
तुकड्यादास म्हणे हित हें भारतभूचें॥
दिवस सुखाचे, स्वातंत्र्याचे ॥ ४ ॥

# २१. रूढि आणि धर्म

( अभंग )

१

रूढि-धर्म जगीं प्रसंगें पालटे । अधर्म तो वाटे अज्ञानांसी ॥
'थोर' जो मानिला राष्ट्राचिया भावें। 'म्हणे तें वागावें' हाचि धर्म ॥
कळों ये तयासी हितगुज सर्व ! आपुलाले भाव दावूं नये ॥
तुकडयादास म्हणे रोकूं नये पाय। तेणें लया जाय देश सारा ॥

२

सर्व मावळती रूढि-धर्म अंगें । तत्त्व कधी भंगे ऐसे नाही ॥
ऐसें असतांना 'धर्म बुडविला' । करावया कला काय झालें ?॥
काय धर्म यांच्या बुडविल्या बुडे ? । स्वतःचि जो बुडे, तारी कैसा?॥
तुकडयादास म्हणे राजसत्तेयोगें । धर्माचीं उपांगें फेरे घेती ॥

३

'धर्म धर्म' काय ओरडता सर्व ?। धर्माचे ते भाव ठावे आम्हां ॥
'जया मार्गें इहपर साधतील । तोचि धर्मशील' निश्चयाने ॥
'चालतां बोलतां सत्य अभ्यासावें' । धर्म त्या म्हणावें निरंतर ॥
तुकडयादास म्हणे 'वेदें जें कथिलें । संतीं आचरिलें तोचि धर्म'॥

४

प्रसंगीं साधावें प्रसंगावधान । ठेवोनिया ध्यान प्रसंगासी ॥
सांभाळावें जन-हित काय कोठे । कैसियाने फिटे पांग लोकीं ॥
आचार-विचार प्रसंगें धरावा । हट्ट ना करावा वेडयाऐसा ॥
तुकडयादास म्हणे ध्येय सांभाळावें । समाजीं वागावें, संतीं केलें ॥

अनुक्रम ५५२३९ दि:

# २२. परधर्माचा द्वेष नको !

(चाल : कायाका पिंजरा डोले.)

कां छळता दुसऱ्या धर्मा ? का यांत मिळे प्रभु-प्रेमा ? ।। धृ. ।।

‘जो कोणि भजे ज्या भावें ।<br>
प्रभुराज तयाला पावे’ ।<br>
हें सूत्र अम्हांला ठावें ।<br>
मग द्रोह येई का कामा ? का यांत मिळे प्रभु-प्रेमा ? ।। १ ।।

कुणि उभेच भक्ती करितो ।<br>
कुणि ध्यान समाधी धरितो ।<br>
कुणि नमाज अपुले पढती ।<br>
तुम्हि त्यांसि हसुनि निष्कामा, का यांत मिळे प्रभु-प्रेमा ? ।। २ ।।

कोणास येशु हा गोड ।<br>
कोणास साधुची चाड ।<br>
कोणास हरीचे लाड ।<br>
तुम्हि एकहि न करा नेमा, कां यांत मिळे प्रभु-प्रेमा ? ।। ३ ।।

प्रभु सर्व जगाचा दाता ।<br>
होतो सर्वांचा त्राता ।<br>
पावतो विमलशा भक्तां ।<br>
तुकड्या म्हणे सोडुनि वर्मा, का यांत मिळे प्रभु-प्रेमा ? ।। ४ ।।

# २३. ग्रामीण खादी

(चाल : कधि येशिल मनमोहना.)

काढुंया सूत घरोघरीं,
वापरूं ग्रामिण खादी बरी ।।धृ.।।

खादिच्या रुपें भारतीं ।
वाचवूं द्रव्य अगणिती ।
गरिबांस पुरवूं भाकरी । वापरूं० ।। १ ।।

उद्योगिं जना लावुनी ।
ग्रामीण कला जगवुनी ।
लाभवूं 'सुराज्या' करीं । वापरूं० ।। २ ।।

गांधिचा मंत्र हा जुना ।
येउंद्या गडेहो ! मनां ।
मन लावुनि चरख्यावरी । वापरूं० ।। ३ ।।

अपुलाच माल नेउनी ।
भोगती मजा परधनी ।
ठेविती गुलामी शिरीं । वापरूं० ।। ४ ।।

समुदाय-प्रार्थना जशी ।
ही सूत-कताई तशी ।
करूं घरोघरीं साजिरी । वापरूं० ।। ५ ।।

तुकड्याचि हाक घेउनी ।
खुणगांठ मनीं बांधुनि ।
लाभवूं भाग्य हें करीं । वापरूं० ।। ६ ।।

## २४. सुराज्य येण्यासाठी उभें, पण —

(चाल : अवताराचें कार्य कराया.)

'सुराज्य' येण्यासाठि उभें पण-मार्ग मधांतुनि रुकलाना ॥धृ०॥

धनिक लोभि पैसा सोडी ना,
मजुर न कामा नेट धरी ।
शेत-शक्ति वाढेल कशी ? गोवंश वधाने दुखलाना ॥ १ ॥

नैतिकता प्रार्थना विसरुनी,
नाच-तमाशे घरोघरीं ।
भांग दारु हौसिने पिण्याला, तरुण आमुचा शिकलाना ॥ २ ॥

कितितरि बहिणी विधवा फिरती,
जुन्या रुढचा पापें करवी ।
धर्म-वेड गेलें न अजुनिही, जातिवर्ण हा चुकलाना ॥ ३ ॥

कार्य विधायक करावयासी,
जीव सदाचा लाज धरी ।
उठला सुटला होइ पुढारी, मान जनाचा मुकलाना ॥ ४ ॥

बहुजन जनता साक्षरतेला,
पात्र न झाली पूर्णपणें ।
तुकडचादास म्हणे यासाठिच, बाग प्रगतिचा सुकलाना ॥ ५ ॥

# २५. समाजाची दुर्दशा !

(चाल : अरे हरि प्यालों, प्याला नामाचा.)

बिघडली घडी, घडी समाजाची ।
कोण लावील वाट याची !
कुणाला चिंता, आहे जगताची ?
पाहतों वाट अम्ही त्याची ।।धृ०।।
जगाची स्थिती बघुनि दुःख वाटे ।
भरुनि अंगा येती कांटे ।।
कष्ट करुनिही पोट रितें राही ।
धनिकां दया जरा नाही ।।
वस्त्र ना अंगीं, चिर्कुट-चिध्यांही ।
कळा लागली शरीरा ही ।।
बघे ना कोणी, कुणा फिकिर याची ?
पाहतो वाट अम्ही त्याची ।। १ ।।
भरंवसा नाही, उरला कोणाचा ।
सख्या जिव्हलगा धनिकांचा ।।
रावरंकांचा, नसे मालकांचा ।
असा हा प्रसंग दुःखाचा ।।
समाजीं आला, काय ठाव त्याचा !
देव हा बघतो कोणाचा- ।
अंत केवढा ! रुचेल तुकडयाचा- ।
बोल का ? करा करा त्याचा-।।
पूर्ण आठवो, सांगा अपुलासा- ।
करुनिया देव, भाव साचा ।।
आमुची आशा पुरवि कोण कैसी ?
पाहतों वाट अम्ही त्याची ।। २ ।।

# २६. विषमता कोणी निर्माण केली ?

(चाल : बाळा जो जो रे.)

बसता काय असें, स्वस्थपणें, बघता केविलवाणें ? ।।धृ०।।

शोधा घर अपुलें, कां पडलें ?
कोणीं हें पोखरलें ?
गेली शक्ति कुठे ? ओस खुलें !
सौख्य कुठे तें नडलें ? बसता० ।। १ ।।

'ईश्वर सर्वांसी सम आहे'
दिसतें काय तसें हें ?
बोला कोणितरी, उणीव हे--
अंतर पडलें कां हें ? । बसता० ।। २ ।।

राजा एक जगीं, रंक दुजा,
ऐसा वाजागाजा ।
दिसतो विषम कसा ? काय मजा ?
शोधा अंतर जा जा ।। बसता० ।। ३ ।।

तुकड्यादास म्हणे शहाणे हो !
तुम्हि-अम्हि एकचि आहों ।
जग हें ना दुसरें, विश्व सरे,
ब्रह्म एकची पसरे ।।बसता० ।। ४ ।।

# २७. जनसेवा हीच खरी भक्ति ।

(चाल : तुमबिन मेरी कौन.)

भक्त बना हो ! भक्त बना हो ! सोडुनि छल-कपटा हो !
अपुल्या, सोडुनि छल-कपटा हो ! ॥
सर्वांगिण ही भक्ति हरीची, बाणुनि घ्या जिवनां हो ॥ धृ. ॥

नाम न घ्या, परि काम करा तें, जी आज्ञा गीतेची ।
विझवा ज्वाला कुटिल जनांची, वात करा सुजनांची ॥ १ ॥

न पुजा, परि गरिबाघरिं राबा, देवचि तो म्हणवोनी ।
अन्न मिळे तें ज्ञान तया द्या, घ्या जवळीच करोनी ॥ २ ॥

मंदिरिं न बसा, पथ सुधरा तो, न रुतो कांटि कुणाला ।
देवावरि टाका न पुष्प परि, पाणिच द्या गरिबाला ॥ ३ ॥

चंदन भृकुटीं ल्या न परी, उजळा सत्याने माथा ।
माळ नसो, परि गळां असावी, कर्तव्याची संथा ॥ ४ ॥

तुकड्यादास म्हणे या वचना टीका न म्हणो कोणी ।
सत्यदेव हा दे दर्शन त्या, आचरणीं जो कोणी ॥ ५ ॥

# २८. साठेबाजी म्हणजे राष्ट्राची चोरी !

( चाल : कां मनि धरिली अढी विठोबा. )

वाहवारे धनलोभी जनहो !
माया तुमची भली ! !
काळ पडे गावांत, तरी कोणा न अधोली दिली ॥ धृ. ॥

घरीं ठेवली, कुजूं लागली,
पेवामधि घातली ।
मरती जन हे बघुनिहि डोळां, जरा न त्यांना दिली ॥ १ ॥

वास लागला पेवामाजीं,
पाण्याने वाहविली ।
तरी "बिना पैशांनी कैसें ?" अशी रुची वाढली ॥ २ ॥

देवाने हें धान्य तुला जें
दिधलें ठेवावया ।
अर्थ तयाचा असा नसे, कुणि मरो न करि तूं दया ॥ ३ ॥

राष्ट्रधनाचे सर्वचि वाली
कां न जाणशी गड्या !
न्यायें करि धनसंचय, सुमनें खर्च करी बापुड्या ! ॥ ४ ॥

'अपुला परका' भेद पहाया
दिलें तुम्हां नच धना ।
तुकड्यादास म्हणे बंधूंनो ! 'सकल आमुचे' म्हणा ॥ ५ ॥

## २९. न्याय-तराजू

( चाल : दो दिवसांची तनु ही साची. )

अमोल ही वेळा जन्माची, वाया व्यसनीं खोवुं नको ।
ज्या अन्नाने पाप वाढतें, नीच अन्न तें सेवुं नको ॥ धृ० ॥
श्रीमंताचा बाळ म्हणोनी अष्टप्रहरवर झोपुं नको ।
देवाने दिधला पैसा जरि व्यभिचाराने फेकुं नको ॥
सन्मार्गाचा वैरी बरा, पण कूमार्गाचा मित्र नको ।
असो नसो कधि काहि मनीं पण विषयांचें उरिं चित्र नको ॥
दुर्जन शत्रू असेल त्याचें मर्म लपवुनी ठेवुं नको ।
रणांगणीं मरणेंच बरें, पण पापिजनाला भिऊं नको ॥
दुसऱ्याची कापुनी मान कधि सावकार तूं होउं नको ।
सत्यपणाने मिळवी पैसा, चोरांना कधि देउं नको ॥
ऐश्वर्याची लाट आलि तरि संतोषाला ढळवुं नको ।
भिक्षेची जरि वेळ पातली, तेज आपुलें मळवुं नको ॥
कर्मनदीच्या धोपट मार्गी न्यायतराजू सोडुं नको ॥
अन्यायाचा मित्र गोड, परि फोड उराशीं जोडुं नको ॥
वडिलोपार्जित हक्क आपुले गमावुनीया बसूं नको ।
कमावण्याची आलि वेळ तरि घरीं चुलीशीं धसूं नको ॥
स्वतंत्रतेचा बैल बरा पण गुलामगिरिचा थोर नको ।
हक्काचा कोंबडा बरा पण दुश्मानाचा मोर नको ॥
माफि मागण्या आला खल तरि अविचाराने देउं नको ।
कधी उलट होईल म्हणुनिया वार उरावर घेउं नको ॥
गुरु, आई अणि बाप, थोरजन यांची आज्ञा मोडुं नको ।
ज्या मार्गाने लाखो तरले असा मार्ग तूं सोडुं नको ॥
वीरवृत्ति ही सदा असो पण हीन-दीनावर वार नको ।
तुकड्यादास म्हणे हरि गा पण दुसऱ्याचा उपकार नको ॥

## ३०. वाहवा रे दारूची नशा ! !

(चाल : शिवराणा जाइ तो रणा घेई.)

वाहवा रे दारुची नशा, आलि अवदशा, हुशारी गेली ।
कंगाल जाहला देश, गुलामी आली ।।धृ.।।

धनवान किती बलवान । कुलवान थोर अणि सान ।।
बुद्धिमान किति गुणवान । उद्योगी मजुर किसान ।।
दारुच्या पायिं गांजले, भिके लागले, मान्यता नुरली ।
त्या परकीयांनी अशी दुर्दशा केली ।। १ ।।

थोरवी अंगि आणावी । दुसऱ्यास हौस शिकवावी ।।
व्यसनांत मती भ्रमवावी । घरदार शेति बुडवावी ।।
हा असा बनविला पिसा, केलि दुर्दशा, पडतसे नालीं ।
गेलि रे लाज अन् शरम, भ्रष्टता व्याली ।।२।।

ओळखी कुणाची नाही । ना मानपान मुळिं काहीं ।।
व्यभिचार जारकर्माही । होतसे साह्य उत्साहीं ।।
खातात मांस हौसिने, वधोनि मनें, जिवां नच वाली ।
नच पुरे गाय अन् बकरी शौकाखाली ।।३।।

तोंडांत शिवी अति नंगी । नित राहि तमाशा-रंगीं ।।
घर पराधीन, बहु तंगी । परि तया सदाही गुंगी ।।
वडिलांचें नांव बुडविलें, द्रव्य उडविलें, जाहला खाली ।
लागला भिकेला, देह-दुर्गती झाली ।। ४ ।।

वाढलें व्यसन हें भारी । शाहण्या-धन्या-घरदारीं ।।
कोणि ना दिसे कैवारी । यांतुनी काढि बाहेरी ।।
व्हा तयार अजुनी तरी, नशा ही पुरी, पताळीं घाली ।
तुकड्यास दिसेना चिन्ह बरें या कालीं ।। ५ ।।

# ३१. आपसांतील भांडण नि इलेक्शन

( चाल : हटातटानें पटा. )

धन आलें चालुनी घरा, पण द्यावें कोणी करीं ?
पिसा हा आधिच भांडण करी ।।धृ०।।

बघतां बघतां जमले सारे, दिसले लोकां अरी ।
गलबला झाला गावान्तरीं ।।

चोरांची धावली नजर, ते शिरलेही भीतरी ।
उजागर म्हणुनिच चोरी करी ।।

(अंतरा) नेतांचि धना हे काय काय बोलती ।
वेड्यापरि यांचें झालें, गेली मती ।
फिरुनिया भांडणें भिडलीं मार्गाप्रती ।

बुद्धिहीनपण असेंच घालो घिरट्या देशावरी ।
पिसा हा आधिच भांडण करी ।। १ ।।

भाग्याने आपुला देश हा स्वतंत्र झाला खरा ।।
काळजी टिकवायाची करा ।।

सत्तालोलुप ओढताण ही सद्भावें आवरा ।
भारता सेवेने सावरा ।।

स्वार्थासाठी जो तो दिसतो झालेला हावरा ।।
धावतो डसावया बावरा ।।

(अंतरा) हे पंथ पक्ष भांडती गांवि अन् घरीं ।
पाडाया दुसऱ्या कुटिल कृत्यही करी ।
जन मरति उपाशी, फिकिर कुणाला परी ?

थोरपणास्तव अपुल्या आणिति देशावर हे मरी ।
पिसा हा आधिच भांडण करी ॥ २ ॥

परस्परांना शिव्या देउनी उघड होती दोन्हिही ।
जना का सुखविल यांची दुही ?

निवडुनि यांना लाभ कुणाचा ? व्हा सावध सर्वही ।
दिसे जी कळकळ, क्षणमात्र ही ।।

लोकशाहि सरकार तुम्हां जें हवें असे दिव्यही ।
देउनी मत निवडा निःस्पृही ।।

(अंतरा) हातांत असे भवितव्य अता आपुल्या ।
द्या स्वार्थरहित सज्जना मता आपुल्या ।
लोभास्तव देशा कां वधता आपुल्या ?

तुकड्यादास म्हणे हक्काने घ्या कर्तव्या शिरीं ।
पिसा हा आधिच भांडण करी ॥ ३ ॥



## ३२. गोपाल व्हा !

( चाल : अवताराचें कार्य कराया. )

भारतियांनो ! गोवंशाची शक्ति प्रीति विसरलां का ? ।ध्रु.॥

गायीचे उपकार म्हणोनी,
जिवंत तरि आपण अजुनी ।
फेड म्हणोनी वधण्या तिजला कसाब हातीं धरला का ? ॥१॥

लाखो गायी कत्तल होती,
उरतिल का शेतीसाठी ?
बैल कशाचे मिळति तुम्हां मग, विचार तरि हा उरला का ? ॥२॥

देश आपुला गोवंशावर,
शेतीवर जगला फुगला ।
गायी बैल जंव नष्टचि होतिल, शेतकरी मग तरला का ? ॥३॥

पाळुनि अपुल्या घरीं गायिला,
दूध-दही द्या मुली-मुलां ॥
निपज करा उत्तम बैलांची, मार्ग असा अंतरला कां ? ॥४॥

दया न ये तरि लाज वाटुं द्या,
गायि कसाबा देउं नका ।
तुकड्या सांगे शेति बुडाली, गर्व न अजुनी जिरला का ? ॥५॥

# ३३. शेतकऱ्यांनो जीवनशेत सुधारा !!

(चाल : हटा तटाने पटा रंगवुनि.)

शेतकरी बंधुनो ! ऐकता काय विनंती जरा ?
अल्प ही सेवा हृदयीं धरा ।।ध्रु.।
कां विकता गायिला कसाबा ? बैल नको का तुम्हां ?
कपाळीं पुरेल का ती जमा ?
उगीच घेउनि पाप शिरावर जातां शेतावरी।
पिके का भूमी असल्यापरीं ?
(अंतरा) द्या दूध-दही गायिचें, चारुनी तिला।
संतुष्ट करा पाजुनी बाळ तान्हुला।
द्या शेजाऱ्याच्या मुला म्हणुनि 'आपुला'।
या मार्गाने सुखसंपत्ती येइल अपुल्या घरां।
अल्प ही सेवा० ।। १ ।।

निर्व्यसनी राहुनी जगीं या, सोडुनि द्या हा चहा।
पिउं नका गांजा दारू पहा ।।
या व्यसनांच्या पायिं बुडाले धनी कितीतरि महा।
लागले भिके, समजुनी रहा ।।
(अंतरा) कां वधता निरअपराधि जीव खावया।
ना मिळे तुम्हां का अन्नचि पोटास या।
सांगाल काय पुस घेतां देवा तया ?
कष्ट करा, आनंदि रहा, कामांत राम हा स्मरा।
अल्प ही सेवा० ।। २ ।।

कां करिता भांडणें आपुल्या धर्म–देश–बंधुशीं ?
समजुनी रहा सदा एकिसी ।।
निष्कपटाने करा आपुल्या व्यवहारा मानसीं ।
भरुं नका घरें कुणाची अशीं ।।

(अंतरा) अम्हि मुर्ख म्हणोनी कुणी भोंदिती किती ।
अमुच्याच धनावर धनी मजा मारिती ।
अजवरी फसविलें असें भ्रमवुनी मती ।
अशा प्रसंगीं द्रव्य उडवुनी कर्ज कशाला करा ?
अल्प ही सेवा० ।। ३ ।।

हौस दावुनी लग्नप्रसंगीं कर्ज काढिती किती ।
जन्मभर दुःख पुढे भोगिती ।।
कर्ज फिटेना, दुःख मिटेना, सणवारादी अती ।
कशाला भ्रमीं पाडिता मती ?

(अंतरा) करुनिया खादिचें वस्त्र वापरा घरीं ।
शेतींत पिकवुनी धान्य ज्वारि–बाजरी ।
साधीच राहणी ठेवा देवापरी ।
जिवंतपणिं वडिलांची सेवा 'देव' समजुनी करा ।
अल्प ही सेवा० ।। ४ ।।

मुलीबाळिचा घेउनि पैसा, लग्न लाविता तिचें ।
म्हणावें 'वडिल' तुम्हां कोणचे ?
पैसा पाहुनि देता मुलगी, जन्म गमविता तिचे ।
ज्ञान हें कुणी दिलें कोठचें ?

(अंतरा) पडुं नका अशा लोभांत, पचेना धन ।
लावाल कुळाला कलंक याच्या गुण ।
द्या मुलगी शोभे जोड असा पाहुन ।

समाजसेवा-व्रता देउनी पुनीत त्यांना करा ।
अल्प ही सेवा० ।। ५ ।।

देवि म्हसाई-खाइ-मराई नवसाला पावती ।
तरी कां वांझ जगीं राहती ?

उगीच देती बळी बिचाऱ्या बकऱ्या मेंढ्या किती ।
करुनिया पाप, पुण्य भाकिती ।।

(अंतरा) हें कोण सांगतो लोभिलबाडाविना ?
अनुभवास येई तरी ध्यान राहिना ?
सोडुनी सुखी व्हा असा आंधळेपणा ।

तुकड्यादास म्हणे या वचनां सदैव कानीं धरा ।
अल्प ही सेवा हृदयीं धरा ।। ६ ।।



# ३४. बळी देणें महत्पाप आहे !

(अभंग)

१

याद ठेवा, कधी बळी द्याल जीवा । कुळामध्ये दिवा न राहील ।।
तयाचा तो आत्मा अंतीं देई शाप । लागतसे पाप दुर्बळाचें ।।
जैसा त्या वधशी तैसी होय गति । काळ घरीं जाती कापणारे ।।
तुकड्यादास म्हणे जीवांसी रक्षावें । तरिच पुण्य पावे जन्मोजन्मीं ।।

२

'दुजियाचा जीव गेला तरी चाले । सुखी आम्हां केलें पाहिजे देवें' ।।
ऐसा ज्याचा भाव तमोगुणावरी । कैसा त्या श्रीहरी पाविजेल ? ।।
प्रभूसी सारिखे सर्व जीव आहे । दयाळू ती माय सर्वांलागी ।।
तुकड्यादास म्हणे स्वार्थरूप जन । भोगती दारूण हत्यापाप ।।

३

पुत्रा माय वधी कैसी ती दयाळ? । आम्ही म्हणों काळ आली जगीं ।।
जीव-जन देवी करीतसे जगीं । काय तीच भंगी कोण सांगे ? ।।
आम्हां भरंवसा जरा नाही याचा । सर्व हा स्वार्थाचा डाव आहे ।।
तुकड्यादास म्हणे देवी ना मागत । नाही या भागत घुमाऱ्याचें ।।

४

देवी-देवांनी हे पुत्र होते झाले । कासयासी केले तरी पती ? ।।
कर्म-भोग नाही कुणासी चुकला । पूर्व जन्मीं केला पाप-संग ।।
भोगणें तें आहे वांझ होऊनिया । कासयासी वाया दुःख घेशी ? ।।
सोड ही भावना, स्मर नारायणा । दुःख जीवजना नको देऊं ।।
तुकड्यादास म्हणे बळी देणें पाप । वाटेल संताप अधिक देवा ।।

# ३५. बुवाबाजीपासून सावधान !

(चाल-अगर है शौक मिलनेका.)

नका भुलुं हो ! चमत्कारा, जगीं हो थापची सारी ।
भोंदु हे आपणा लुटती, दावुनी थोरवी भारी ॥ धृ० ॥

संत जरि पुत्र हे देते, न मरते लोक पृथ्वीचे ।
निकामी स्वार्थिजन भलत्या रडोनी सांगती थोरी ॥ १ ॥

कावरे लोभि जे असती, भ्रष्ट होती तयांच्याने ।
न सुचतें ज्ञानही त्यांना, मिरविती भोंदुची थोरी ॥ २ ॥

ठेवुनी साक्ष ज्ञानोबा, म्हणे ''तो भिंत चालविली'' ।
कळेना वर्म संतांचें, वाहती मार्गि कांटेरी ॥ ३ ॥

चमत्कारेंच संतांची परीक्षा होत जरि असती ।
गारुडी काय ना करिती ? लाविती बाग आंबेरी ॥ ४ ॥

संत तेची जगीं जाणा, जयांचे विषय हरि झाले ।
म्हणे तुकड्या निजज्ञानें, बोधुनीया जना तारी ॥ ५ ॥

# ३६. स्मृतिसाधनांचा विपर्यास

( अभंग )

१

आमुचे सणवार । सर्व खाण्याचा बाजार ॥
तत्त्व गेलें संतांसवें । उरले पोटाचे गोडवे ॥
भिन्नेपणा आला । हाचि सुधार संचला ॥
तुकड्या म्हणे नांवा । हिंदपुत्रें दिला दिवा ॥

२

पुण्यक्षेत्रें झालीं व्यापारांची खाण । जरा माझें मन शांत नोहे ॥
भोळ्याभाविकांसी बहु त्रास देती । पुजाऱ्यांनी मति भ्रष्टविली ॥
सदा हायहाय द्रव्याच्या चिंतनीं । 'पुण्य करा कोणी' ओरडती ॥
तुकड्यादास म्हणे आपुली ऐपत । पाहोनि समस्त पाय टाका ॥

३

चीड येते मला काही हरदासांची । सांगती कृष्णाची बाळक्रीडा ॥
विकारी हे लोक तयां काय कळे ? म्हणती 'सावळें ऐसें केलें ॥
तरि आम्हां काय भोगाया परवा? श्रीकृष्णाची आज्ञा पहा बरें' ॥
कोण जाणे त्यांचे गुण-अधिकार । तुकड्या म्हणे येर भोग पाहे ॥

४

थोरांचें चरित्र प्रसंगें लावावें । जाणोनि करावें कार्य भूमीं ॥
जन हासताती गोपींचिया प्रेमें । कळेना हीं वर्मं हरिदासांसी ॥
दोघेंही विषयी श्रोते-वक्ते झाले । देवधर्म नेले कुमार्गासी ॥
तुकड्यादास म्हणे आजींच्या समाजा । कुरुक्षेत्र बाजा गाजवावा ॥

५

जन्ममृत्युदिन यासचि पूजती । सर्वकाळ स्मृति होत राहो ।।
थोरांचें चरित्र रहावें सामोरी । तेणें ध्यानें करी सर्व लोक ।।
कीर्तिवंत जनीं कीर्ति करुनि गेले । आम्हासी हे दिलें धडे त्यांनी ।।
तुकड्यादास म्हणे वागावयासाठी । पाडल्या परि गाठी व्यवहारीं या।।

# ३७. प्रपंच हा आहे पाया परमार्थाचा !

(अभंग)

कोणीं तुज बोध दिला एकदेशी । 'त्याग संसारासी' म्हणोनिया ?।।
बहु त्यागियला संसार आपुला । दुजियांचा केला नाश त्यांनी ।।
लंगोटी लावली, वासना ना गेली । अपकीर्ति केली लोकांमाजीं ।।
तुकड्यादास म्हणे नको सोडूं घर । मन हें जोंवर स्थिर नाही ।।

२

कोण म्हणे तुज 'न करी संसार' । कोणीं शास्त्राधार दिला ऐसा ?।।
'तनु तोडणें हें पातक मानती' । ऐसी आहे श्रुति ब्रह्मसूत्रीं ।।
परि काही बंध घातले थोराने । तयांची वचनें भुलूं नये ।।
तुकड्यादास म्हणे 'विषयीं मरावें' । ऐसें नाही देवें सांगितलें ।।

३

प्रपंच हा आहे पाया परमार्थाचा । भाव हा आमुचा निश्चयाने ।।
प्रपंचाचा मार्ग नाही धड झाला । परमार्थ बुडाला साधकांचा ।।
प्रपंच साधील तोचि पुढे जाय । परमार्थाची सोय तया लाभे ।।

उत्तम व्यवहार, तेज अंगीं पूर्ण । हरिनाम कीर्तन सदा घरीं ॥
तुकड्यादास म्हणे पूर्वज शांतले । जयाने हे केले धर्म लोकीं ॥

४

कोण म्हणे 'धन करूं नये गाठीं । हिंडावें कपाटीं हाटीं सारे'? ॥
मागोनिया भीक कोण पुरवील ? । संसार होईल कैसा याने ? ॥
शेत बागाईत कशाने करावे ? धनाविण व्हावें फकीरचि ॥
तुकड्यादास म्हणे धन-जोड करा । सत्याच्या व्यापारा करोनिया ॥

५

चोरूनि आणिलें तें कैसें पचेल ?। धन तें जाईल त्याच मार्गी ॥
कष्ट करोनिया जे धना जोडिती । तेचि सुखी होती सर्वकाळ ॥
उत्तम व्यवहार, दया दीनांवरी । धन्य तो संसारीं जन्मा आला ॥
तुकड्यादास म्हणे तयाच्या मरणीं । रडतील जनीं लोक सारे ॥

६

लोकां सांभाळूनि आपण कमावी । 'दोघें सुखी व्हावीं' ऐसी मति ॥
जाणतो अंतर जीवदया-भावें । त्यासीच म्हणावें कीर्तिवंत ॥
त्यांतुनिया पोषी संत-सेवकांसी । भीक भिकाऱ्यांसी भावें देई ॥
तुकड्यादास म्हणे तयाचें दर्शन । घेतांना पावन देह होतो ॥

७

नेटका करोनि प्रपंच आपुला । दुजा साह्य झाला बोधरूपें ॥
आसक्तीचें मूळ खोदियलें ज्ञानें । प्रारब्ध-ओघानें भोग भोगी ॥
प्रयत्नाचें अंग सदा सर्वकाळ । निष्काम निर्मळ कार्य करी ॥
तुकड्यादास म्हणे धन्य तो संसारी । सदा परोपकारी न्यायनिष्ठ ॥

# ३८. दानाचें रहस्य व प्रयत्नाचें महत्त्व

( अभंग )

१

दानें घडे पाप, दानें पुण्य होई । दानें गोत्र जाई स्वर्गामाजीं ॥
दानाने उद्धार, दानाने भिकार । वाढे राष्ट्रीं फार दुर्बलता ॥
'कोणा काय द्यावें' कळावे हें आधीं । दानें पुण्यें तधीं लाभतील ॥
तुकड्यादास म्हणे आम्हीं द्यावें दान । करिती मद्यपान भिकारी हे ॥

२

दुःखाने पीडला, द्रव्याने नाडला । कष्टाविण झाला पंगु जैसा ॥
तैसिया आधार देऊनि चालवा । हातभार द्यावा साधे तैसा ॥
उद्योगाचें अंग दाखवावें तया । व्यर्थ पोसुनिया ठेवूं नये ॥
तुकड्यादास म्हणे कष्टाचा संसार । कष्टाविण नर सुखी नोहे ॥

३

गुंग होते वेद अर्थचि लागेना । तेणें मतें नाना पंथ झाले ॥
बुद्धीचिया जोरें अर्थ प्रकाशाला । शोध लावियला तत्त्वज्ञांनी ॥
रेलगाडी काही मोटारी निघाल्या । बिनतारी झाल्या ध्वनि-कला ॥
तुकड्यादास म्हणे प्रयत्नाचें फळ । देव देतो बळ विकासासी ॥

४

'पुष्पक विमान' पुराणीं ऐकिलें । प्रत्यक्ष पाहिलें आता आम्ही ॥
शोध लावणारे करिती कमाल । बुद्धीचें तें बल वाढवोनि ॥
'दिलें देवें सर्व परि नेणे कोणी' । आम्हां यावरूनि झालें ठावें ॥
तुकड्यादास म्हणे जरी शांती नाही । व्यवहारी सर्वही कामीं पडे ॥

# ३९. देशासाठी होई शिपायी

( चाल--कृष्ण पाहिला का माझा. )

सावध हो चल शेतकऱ्या रे !
आळस धरुनी बसला कां ? ।। धृ० ।।

देश तुझा हा स्वतंत्र झाला,
तुझाच तूं राजा इथला ।
देशासाठी होइ शिपायी, लोभासाठी रुसला कां ? ।। १ ।।

जातपात हो सार बाजुला,
म्हण "मी हिंदी वीरगडी"
पंथसंप्रदायांचा फासा, सोड सोड रे कसला कां ? ।। २ ।।

भारतभूमी गोपालांची,
मुळ रहिवासी तूं इथला ।
उघड नेत्र राष्ट्राच्याकरितां, ये समोर तू फसला कां ? ।। ३ ।।

तुकड्यादास म्हणे हो संधी,
खोवुं नको भोळ्या सुजना !
गांधीजीचें व्रत घे आता, गटागटांतुनि धसला कां ? ।। ४ ।।

# ४०, संघटन व स्वातंत्र्य-रक्षण

( चाल--नरजन्मामधिं नरा. )

सांभाळुनि घे पाय, पुढे बघ, धोका आहे तुला।
भारता ! धुंद कसा जाहला ? ॥ धृ० ॥

आंतरीय या पक्षबाजि अणि प्रांतबाजिच्या निशीं।
शत्रु तव चाल करी छातिशी ॥
खळबळले चहुंकडे शत्रु तव, मित्रचि म्हणसी तयां।
भोळसट राहुं नको अजुनिया ॥

(अं.) रे उघड नेत्र, ही ऐक कर्णि आरळी।
बसशील स्वस्थ तरि जाशि शत्रुसी बळी।
जोड रे आपुली जोड अता साखळी।
सर्व तऱ्हेने तयार हो, म्हणविसी जरी तूं भला
भारता ! धुंद कसा जाहला ? ॥ १ ॥

एक एक क्षण फुका तुझा आणि शत्रू तयारी करी।
व्याप हा कोण पुढे आवरी ? ॥
जबाबदारी तुझ्यावरचि हे, अनपढ जनता खरी।
बिचारी 'हाय हाय' मनिं जरी ॥
गुलामगिरितुनि अताच सुटली, पुन्हा नशीबीं परी।
न येवो ग्रहण अता सामुरी ॥

(अं.) बिघडुं दे शेत, परि कुंपण घे घालुनी।
त्यापरी शिपायी सज्ज करी सजवुनी।
साहित्य सर्व घे, भीति न दावो कुणी।

लाव छातिला माति, उभा हो रक्षण करण्या खुला ।
भारता ! धुंद कसा जाहला ? ॥ २ ॥
सोड मोह सत्तेचा, अपल्या पंथांचा जातिचा ।
अगोदर विचार कर शत्रुचा ॥
तुझ्यावरचि जे टपून असती शक्ति-युक्ति घेउनी ।
न त्यांना भीक घाल जाउनी ॥
बोल 'गांधिजी' बोल 'शिवाजी,' रंग चढूं दे पुरा ।
भारता ! होउं नको घाबरा ॥
(अं.) खाउनी भाकरी-मिरची, लढ जाउनी ।
स्वातंत्र्य रक्षण्या घेइ धडक धावुनी ।
अमर हो, प्राण जरि गेला समरांगणीं ।
मानवधर्मा जाग जाग रे, सोडुनिया गलबला ।
भारता ! धुंद कसा जाहला ? ॥ ३ ॥
तुझ्या शक्तिचा तुझ्या युक्तिचा ठाव असूं दे तुला ।
पुढे चल बघत बघत आपुला ॥
साधुसंत आणि थोर-तरुणही याच कार्यि रंगु दे ।
विषय हा घरोघरीं सांगु दे ॥
हीच वेळ अणि हाच काळ बघ कठिण तुझ्या राशिला
स्मरुनि कर कार्य पूज्य गांधिला ॥
(अं.) प्रार्थुया प्रभूला, 'यश दे देशाप्रती ।
फडकुं दे तिरंगा अमर अता भारतीं' ।
या साठिच सगळे एक होउं सन्मतीं ।
तुकड्यादास म्हणे सावध हो, घे गीता साथिला ।
भारता ! धुंद कसा जाहला ? ॥ ४ ॥

# ४१. पूज्य गांधीजींची स्फूर्ति

(चाल : पटातटाला फोडुनि.)

पूज्य गांधिची सद्‌गुणस्फूर्ति नसानसांतुनि स्फुरे ।
भारता मोह न हा आवरे ।।धृ०।।
'जिकडे तिकडे रामराज्य हो' ध्वनि हा गगनीं फिरे ।
घरोघरिं वेडचि याचें भरे ।।
जो तो अपुल्या शक्तियुक्तिने कार्य कराया झुरे ।
'आमुचा देश' गौरवें स्मरे ।।
घराघरांतुनि वीर शिपायी धावताति बावरे ।
घ्यावया आज्ञा, देती शिरें ।।
(अं.) ही प्रचंड शक्ती कोठुनिया उमलली ?
ही अवघड कोंडी कशी कुणा समजली ?
ही मानवतेची युक्ति कशी उमगली ?
निःसंशय हें सिद्ध जाहलें, तेज यशाचें भरे ।
भारता मोह न हा आवरे ।। १ ।।
समाज–शिक्षण, समान जीवन, प्राप्त व्हावया जना ।
शेकडों कर्त्यांच्या योजना ।।
काय काय होईल भारतीं, कळे न अजुनी कुणा ।
रंग हा वाढतसे नित दुणा ।।
जाति पंथ संप्रदाय सारे, विसरुनि ह्या भावना ।
सांगती 'म्हणा भारतिय म्हणा' ।।
(अं.) ही स्फूर्ति–ज्योति प्रगटली अता भारतीं ।
झळकला प्रगटला प्रकाश हा भोवती ।
सरकार–प्रजेची एकच व्हाया युति ।
तुकड्यादास म्हणे जनता ही जनपद–कार्या फिरे ।
भारता मोह न हा आवरे ।। २ ।।

# ४२. स्वर्गसुखाचें स्वप्न

(चाल : शिवराणा जाइ तो रणा,)

लाभलें भाग्य भारता, सुदिन हा अता क्षणीं येताहे ।
त्या स्वर्गसुखाचें स्वप्न रंगुनी पाहे ॥धृ०॥

जातील भेद विलयाला, जे दिसती आज जगाला ।
कोणी ना भिवविल कुणाला, समतोल शक्ति सर्वांला ।
धनधान्य विपुल घरोघरीं, ज्वारिबाजरी सुखाने खा हें ।
गावांत करा उद्योग मनाला जो ये ॥ १ ॥

कोणि ना व्यसनि राहतील, जे दारू-भांग पितील ।
नच जुगार डोकावील, चाहड्यांस न वेळ मिळेल ।
होतील कायदे असे, गुंड माणसें नीतिने राहे ।
का जरा संशयित दिसे, पकडला जाये ॥ २ ॥

जातीयवाद हा सारा, लाजुनी फिरे माघारा ।
दैवास मिळेना थारा, चढतील, मुकुट गुणिवीरां ।
शस्त्रास्त्र जळुनि शक्तिने, होउनी मनें शुद्ध जणुं राहे ।
या भारतदेशा जग हें झुरुनी पाहे ॥ ३ ॥

नांदेल राज्य रामाचें, येतील पुढे कामाचे ।
श्रीमंत धनी सर्वांचें, होईल हृदय समतेचें ।
जो कष्ट करिल तो सुखी, एरवी दुखी, भेद ना राहे ।
मागती भीक जे करिति न उद्योगा हे ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
क्रमांक ..२५२३९.. वि: काव्य
क्रमांक ९१५८ नोंद दि: ३।११।२५

मठमंदिरक्षेत्रहि सारे, होतील आश्रमचि प्यारे।
हे साधूपुजारी सारे, झटतील देश-उपकारें।
प्रत्येक वीर भारतीं, कलेची मती अनुभवीताहे।
कोणि ना कुणाचें अन्न बसोनी खाये ।। ५ ।।

हे धर्म-वर्म सर्वांचे, धरतील मार्ग सत्याचे।
वैमनस्य जें स्वजनांचें, जाईल मिटोनी साचें।
गोधनें वाढतिल अती, शेतिची स्थिती सुधारुनि जाये।
घरोघरीं दूध अणि तूप मुलाबाळां हें ।।६।।

"स्वराज्य सुराज्यासाठी" ही वसेल बुद्धी पोटीं।
त्या विश्वबंधुतेसाठी, ही सत्य-अहिंसा मोठी।
हा दिसे भाव अंतरीं, स्वप्न बहुपरीं लपुनि बघताहे।
तुकड्यास सुचिन्हचि गमे, हर्ष ना माये ।। ७ ।।

## ४३. गुरुदेवाचें अवतरण

(चाल : वंदन सतत मुकुंदपदाला.)

अवतरला गुरुदेव भारतीं।
संचरला, मनिं भरला, स्फुरला,
झाला जनतेचा सारथी ।।धृ०।।

ग्रामसफाई करुनि सकाळीं।
रामधून ही घेउनि वेळीं।
शुद्ध मनाने निज नियमाने, ठेविति दारीं देवि आरती ।। १ ।।

उद्योगी राष्ट्रकार्य म्हणुनी ।
कृषि-शक्तीस्तव राबति झिजुनी ।
देह सदा देशाच्या कामीं, राष्ट्रपित्या भूषविण्या जगतीं ॥ २ ॥

सायंकाळीं निर्मळ वेळीं ।
स्वच्छ होउनी बसती सगळीं ।
राहति घेउनि प्रीय प्रार्थने, स्थितप्रज्ञता हृदयीं धरती ॥ ३ ॥

एक जात अणि एक पंथही ।
असो साधनें जरि अनंत हीं ।
सगळ्या धर्मां आदर देउनि, बंधुभाव ठेवण्यास चित्तीं ॥ ४ ॥

तुकड्यादास म्हणे या सगळे ।
सोडुनिया हृदयांतिल काळें ।
नांदु सुखाने अपुल्या देशीं, सदैव मिळवाया सुखशांति ॥ ५ ॥

## ४४. करूं सोनें जरि असेल माती !

(चाल : भारत माझा स्वतंत्र झाला.)

झरझर झरझर या पुढती या ।
गर्जत गर्जत सांगु जगा या ।
स्वतंत्र झाला भारत सखया ! या धावुनिया सांभाळाया ॥धृ०॥

वीर तरुणहो ! ऐका ऐका । एक करोनी रावा-रंका ।
सरळ चालवूं अपुली नौका । या धावुनिया० ॥ १ ॥

जातियता ही धाडुं लयाला । पंथांवरती घालुनि घाला ।
करूं शिपायी ह्या सगळ्यांला । या धावुनिया० ॥ २ ॥

एकचि पंथ करूंया मोठा । देश सुखी हो चारी वाटां ।
उपटुनि काढूं असेल काटा । या धावुनिया० ॥ ३ ॥

सद्धर्माची जागवुं ज्योति । जिवा-जिवांतुनि वाढवुं नीति ।
करुं सोनें जरि असेल माती । या धावुनिया० ॥ ४ ॥

तुकड्यादास म्हणे देशाला । फळाफुलांनी सुखवूं त्याला ।
स्वातंत्र्याच्या उभवुं ध्वजाला । या धावुनिया० ॥ ५ ॥

## ४५. यशोचिंतन !

१३४९८

(चाल : हमारा प्यारा हिंदुस्थान.)

अमुचा देश सुखाची खाण ।
यासी यश देवो भगवान ॥धृ०॥

धनधान्याने हो भरपुर हा । गोवंशाने हो सुंदर हा ।
वाढो शेती शक्ति-खदान । यासी० ॥ १ ॥

वीर तरुण हो सर्व शिपायी । तत्पर देशासाठि सदाहीं ।
रक्षो राष्ट्र पित्याचें दान । यासी० ॥ २ ॥

राष्ट्रध्वज हा प्रीय तिरंगा । अखंड राहो जैसी गंगा ।
वाढो सत्यअहिंसा-मान । यासी० ॥ ३ ॥

हिंदराष्ट्र हें अखंड नांदो । अखिल विश्वही यासचि वंदो ।
सगळ्या धर्मांचा जिवप्राण । यासी० ॥ ४ ॥

जातीभेद मिटो हा सारा । मानवतेनें हो अति प्यारा ।
तुकड्यादास करी गुणगान । यासी० ॥ ५ ॥

* समाप्त *

# ❀ राष्ट्रसंतांचा ग्रंथ-प्रसाद ❀

## ( मराठी )

| | | रु. न. पै. |
|---|---|---|
| १ | अनुभवसागर ( ५०१ भजनें ) | १ - ७५ |
| २ | अनुभवामृत, भा. २ ( ७०१ अभंग ) | १ - २५ |
| ३ | आदेशरचना ( ४०१ श्लोक ) | ० - ५६ |
| ४ | स्फूर्तितरंग ( ७०१ श्लोक ) | ० - ८७ |
| ५ | सुविचार-स्मरणी ( ७२१ बोधवचनें ) | १ - ०० |
| ६ | जीवनजागृति ( भजनमाला ) | ० - ५६ |
| ७ | लोकशाहीचे पोवाडे | ० - ३१ |
| ८ | श्रीगुरुदेव विवाहपद्धति | ० - ५० |
| ९ | गीताप्रसाद ( लेखसंग्रह ) | १ - २५ |
| १० | युगप्रभात ,, | १ - २५ |
| ११ | प्रार्थनाप्रदीप ,, | ० - ३७ |
| १२ | सक्रिय प्रार्थनापाठ ( प्रार्थनाविधि ) | ० - २५ |
| १३ | क्रांतिवीणा भजनावलि ( भजनें ) | ० - ५० |
| १४ | विश्वशांतियोग ( लेखसंग्रह ) | २ - ०० |
| १५ | भूदान-यज्ञ गीत ( गीतें ) | ० - १९ |
| १६ | समाज-संजीवनी ( भजनें ) | ० - ६० |
| १७ | आनंदामृत ( ओवीबद्ध ) | ० - ५० |
| १८ | दिव्यदर्शन भजनावलि ( भजनें ) | ० - ५६ |
| १९ | ग्रामगीता ( ओवीबद्ध ग्रंथ ) | ५ - ०० |
| २० | नव-जागृति भजनावलि ( भजनें ) | ० - ३७ |
| २१ | विवेक-माधुरी भजनावलि ( भजनें ) | ० - ५० |
| २२ | प्रचार-मार्गदर्शिका | ० - ७५ |

## ( हिन्दी )

| | | रु. न.पै. |
|---|---|---|
| २३ | अनुभवप्रकाश, भाग १ ( ३०९ भजनें ) | १ – ५० |
| २४ | अनुभवप्रकाश, भाग २ ( ५२५ भजनें ) | १ – ५० |
| २५ | लहरकी बरखा ( ७२१ श्लोक ) | १ – ५० |
| २६ | प्रार्थना-पद्धति ( प्रार्थना-विधि ) | ० – ५० |
| २७ | सक्रिय प्रार्थना-पाठ ( प्रार्थना-विधि ) | ० – १० |
| २८ | जीवनज्योति ( भजन-संग्रह ) | ० – ५० |
| २९ | राष्ट्रीय भजनावलि ( भजन-संग्रह ) | १ – ५० |
| ३० | गांधीगीत ( गीत-श्रद्धांजलि ) | ० – १९ |
| ३१ | सेवास्वधर्म ( नित्यकर्मविधि ) | ० – ५६ |
| ३२ | क्रांति-दीप भजनावलि ( गीत ) | ० – ५० |
| ३३ | भूदान-यज्ञ गीत | ० – १५ |
| ३४ | सुधासिंधू भजनावलि | ० – ५० |
| ३५ | मेरी जापानयात्रा | १ – २५ |
| ३६ | भारत साधु समाजकी सेवासाधना | १ – ५० |
| ३७ | ज्ञान-दीप भजनावलि ( गीत ) | ० – ३७ |
| ३८ | राष्ट्र-नौका भजनावलि ( गीत ) | ० – ७५ |
| ३९ | सद्विचार प्रवाह | १ – ०० |
| ४० | आत्मप्रभा भजनावलि | १ – ०० |
| ४१ | नवप्रकाश ( भाषण संग्रह ) | ० – ३७ |
| ४२ | विवेक-सरिता भजनावलि | १ – २५ |

## ( इंग्लिश )

| | | |
|---|---|---|
| ४३ | संत तुकडोजी महाराज | ० – १२ |
| ४४ | युनिव्हर्सल ब्रदरहूड | ० – १९ |
| ४५ | श्रीगुरुदेव सेवामंडल | ३ – ०० |
| ४६ | ग्लीम्स ऑफ न्यू एज | १ – ७५ |
| ४७ | स्पार्क ऑफ थॉटस् | १ – ७५ |
| ४८ | साँग सिलेस्टिअल | १ – ७५ |

९३४५४
रा. क्र.

## प्रमुख ग्रंथवितरक—

१ श्रीगुरुदेव भजन विभाग, गुरुकुंज. (जि. अमरावती)
२ श्रीगुरुदेव सेवामंडल, नगर-कार्यालय, इतवारा, नागपुर.
३ श्री. जगदीशराव सालवे, चान्दा.
४ ,, ठाकूर अॅण्ड कंपनी लि. अमरावती.
५ ,, बालकृष्ण लक्ष्मण पाठक, मोतीबाजार, बंबई.
६ ,, रामचंद्र पांडुरंग बुकसेलर, इतवारा, नागपुर.
७ ,, कर्मवीर बुकडेपो, महल, नागपुर.
८ ,, गंगमवार बुकसेलर, यवतमाल.
९ ,, अनमदवार बुकसेलर, देसाईगंज, जि. चांदा.
१० ,, गोपीलालजी चांडक, मालीपुरा, अकोला.
११ ,, बाजीराव टिकारामजी कनपटे, तुमसर, जि. भंडारा.
१२ अ. भा. सर्वसेवा संघ, गोसेवा चर्मालय, सीताबर्डी, नागपुर.
१३ श्री. के. एस्. चतूर, बुकसेलर, वरोरा.
१४ ,, विद्यार्थी वस्तु भंडार, इतवारा, नागपुर.
१५ ,, स्वराज्य भंडार, वर्धा.
१६ ,, सुत्रावे, बुकसेलर, वणी, जि. यवतमाल.
१७ ,, नेवे ब्रदर्स बुकसेलर, जलगांव पू. खा.
१८ ,, रा. जै. नंदनवार, जमालपुर रोड, अहमदाबाद.
१९ ,, लक्ष्मीकांत बुकडेपो, अंबागेट, अमरावती.
२० ,, न्यू बुकडेपो, नागपुर.
२१ ,, जयहिंद बुकडेपो, अमरावती.
२२ ,, नवयुग बुकडेपो, अमरावती.
२३ ,, हातोले अॅण्ड सन्स, अमरावती.
२४ ,, श्री. ना. वा. गुजरकार, शिरजगांव, हिंगणघाट.

---

REFBK-0013494
REFBK-0013494